# जनसंपर्क अधिकारी

पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर, वसई-विरार यांचे
कार्यालय रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व, जि. ठाणे
दुरध्वनी क्र. ०२२-२९४५१००१
**E-mail: pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in**


प्रेस नोट क्र-५५ दिनांक - २३/०२/२०२४

## दोन वयोवृध्द नागरिकांना जिवे ठार मारण्याचा प्रयत्न करणा-या आरोपीतांना अटक - वसई पोलीस ठाणेची कामगीरी.

वसई पोलीस ठाणेच्या कार्यक्षेत्रात फिर्यादी नामे सिल्वेस्टर डायगो परेरा हे दिनांक - १७/०२/२०२४ रोजी पहाटे ०५.०० वा चे सुमारास मॉर्निंग वॉकसाठी जात असताना फिर्यादी यांच्या भावाच्या घराबाहे २ अनोळखी मुले व १ अनोळखी महिला आपपसात भांडण करुन आरडाओरड करीत असल्याने फिर्यादी यांचे भाउ त्यांना समजवण्यासाठी गेले असता त्यांचे भावाला ते अनोळखी इसम व महिला हे मारहाण करीत असल्याचे पाहुन फिर्यादी हे त्यांचे भांडण सोडवण्यासाठी गेले असता "तु आमच्यातील भांडण सोडवणारा कोण आलास तुला आता जिवे मारतो." असे म्हणुन तिघांनी आपसांत संगनमत करुन फिर्यादी व फिर्यादी यांच्या भावास जिवाशी संपवण्याची धमकी देवून जिवे ठार मारण्याचे उद्देशाने फिर्यादी यांच्या डोक्यात जोराने वारंवार दगडाने मारुन व डोळयास कोणत्यातरी हत्याराने ठोसा मारून जखमी केले बाबत फिर्यादी यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन अनोळखी आरोपीतांविरोधात वसई पोस्टे गु.र.नं. ३६/२०२४ भा.द.वि.स कलम ३०७,३२४,३४१,५०४,५०६,३४ प्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आला होता.

सदर गुन्हयाचे गांभीर्य लक्षात घेऊन मा. पोलीस उप-आयुक्त, परिमंडळ- २ वसई, सहाय्यक पोलीस आयुक्त व प्रभारी अधिकारी यांचे मार्गदर्शक सुचनाप्रमाणे गुन्हे प्रकटीकरण शाखेच्या अधिकारी व अंमलदार तसेच तपास अधिकारी यांचे ०३ पथके तयार करुन चार दिवस सतत प्रयत्न करून तांत्रीक विश्लेषण व गोपनीय बातमीदारांच्या माहितीचे आधारे सदर गुन्हयातील आरोपीतांची नावे निष्पन्न करुन सर्व तीन आरोपीतांना नंदाखाल, अर्नाळा येथुन अटक केले आहे.

सदरची कामगिरी मा.श्री.पौणिमा चौगुली-श्रींगी, पोलीस उप-आयुक्त, परिमंडळ - २ वसई, मा. श्रीमती. पद्मजा बढे, सहा.पोलीस आयुक्त, वसई विभाग, यांचे मार्गदर्शनाखाली श्री. रणजित आंधळे, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, वसई पोलीस ठाणे, श्री. अब्दुलहक देसाई पोलीस निरिक्षक (गुन्हे), गुन्हे प्रकटीकरण पथकाचे स.पो.नि. सुनिल पवार, सागर चव्हाण, पो.उप.निरी. राहुल फड, पो.हवा. सुनिल मलावकर, मिलींद घरत, पो.ना. रमेश पोटे, पो.अं. सुर्यकांत मुंढे, अक्षय नांदगावकर, सौरभ दराडे, प्रशांत आहेर, अमोल बरडे, म.पो.अं. सोनल शेळके यांच्या पथकाने केलेली आहे.


मिरा - भाईंदर, वसई - विरार पोलीस आयुक्तालय
वसई पोलीस ठाणे
vivo V27
Feb 23, 2024, 12:46